प्रकरण दुसरे -

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकवितां-मागील प्रेरणा.

## - प्रकरण दुसरे -

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकविता[redacted]मागील प्रेरणा

मराठीमध्ये निसर्गचित्रणाची परंपरा ज्ञानेश्वरांइतकी प्राचीन आहे. महानुभाव संप्रदायातील वाङ्मयात निसर्गाची सुरेख चित्रे आढळतात. ज्ञानेश्वरांच्या निसर्गाभिरुचीविषयी कुणालाही शंका नाही. प्राचीन मराठी वाङ्मयात पुढेही अनेकांनी निसर्गचित्रण केलेले आहे. " काव्य आणि काव्योदय " कारांनी प्राचीन मराठी काव्यात निसर्गचित्रण नसल्याची तक्रार केलेली आहे. ते म्हणतात, " महाराष्ट्रातील कवींची प्रतिभा या बाजूने जागीच झालेली नव्हती .... हृदय संस्कारक्षम असावे लागते, ते तसे नव्हते ............ नाना रूपांनी, नाना गुणांनी आविर्भूत होणारी भौतिक सृष्टी जेथे असेल तेथे प्रतिभेच्या आविर्भावास आणि काव्याच्या स्फुरणास अवश्य असणाऱ्या कारणांपैकी एक हजर आहे असे म्हणावयास हरकत नाही. महाराष्ट्रात काव्योदयाचे हे प्रसादचिन्ह हजर असून तेथे त्या तऱ्हेचा काव्योदय झाला नाही. असे का? सृष्टीच्या अंतरंगात निजून असलेले चैतन्य ओळखून त्याशी गुजगोष्टी करणारी अंतर्भेदी प्रतिभा महाराष्ट्राच्या वाटयास आली नव्हती." " काव्य आणि काव्योदयकारा" प्रमाणेच सर्वसाधारण माणसाचीही अशीच समजूत आहे. पण प्राचीन मराठी कवींची प्रतिभा निसर्गचित्रणाच्या बाबतीत संस्कारक्षम नव्हती ही तक्रार गैरसमजावर आधारलेली आहे. प्राचीन मराठीत साध्यरूप निसर्गचित्रण फारसे आढळत नाही, हे खरे आहे. प्राचीन कवितेचे स्वरूप पारमार्थिक असल्याने असे घडलेले आहे. तथापि कोणत्याही काळी कवींना निसर्गाचे संस्कार नाकारता येणे शक्य नाही हे आपल्या मागील प्रकरणावरून स्पष्ट होण्याजोगे आहे. डॉ. वि. ना. कुलकर्णी यांनी आपल्या प्रबंधात प्राचीन मराठी कवितेत आढळणाऱ्या शेकडो

उदाहरणांचा तपशील देऊन प्राचीन मराठी कवींची निसर्गविषयक अभिरुची स्पष्ट केली आहे आणि काव्य आणि काव्योदयकारांच्या मताचे खंडन केले आहे. [१]

निसर्गचित्रण साध्यरूपात होवो अथवा साधनरूपात होवो, त्यात कवीची निसर्गविषयक अभिरुची स्पष्ट होते की नाही हा भाग महत्त्वाचा ठरतो. प्राचीन मराठीत साध्यरूप निसर्ग--चित्रणाचा पूर्णत: खडखडाट आहे असेही नाही. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर . या कवींची काही निसर्गचित्रणे साध्यरूप झालेली आहेत. निसर्ग हा त्यांच्या भावनेचे आलंबन असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तथापि प्राचीन कवींचा दृष्टीकोण पारमार्थिक असल्यामुळे परमार्थ साधना हेच त्यांनी आपले साध्य मानलेले होते. त्यामुळे प्राचीन मराठी कवितेत साध्यरूप निसर्गचित्रण फारसे न येता ते प्राधान्याने उद्दीपन, पृष्ठभूमि, तत्त्वज्ञानप्रतिपादन, उपदेश आणि अलंकरण या रूपात व्यक्त झालेले आहे, पण त्यातूनही निसर्गाच्याबाबतीत त्या कवींचे हृदय संस्कारक्षम होते हे स्पष्ट होण्याजोगे आहे.

आधुनिक मराठी कवितेमध्ये साध्यरूप निसर्गचित्रणाचा पायंडा केशवसुतांनी पाडलेला दिसतो. आधुनिक मराठी कविता लौकिक, ऐहिक बनल्यामुळे निसर्गचित्रणाला तिच्यात अधिक अवसर मिळू लागला. प्राचीन मराठी कवितेपेक्षा आधुनिक मराठी कवितेत निसर्गाला विपुल वाव मिळण्याचे कारण म्हणजे काव्यविषयक बदलेला हा दृष्टिकोण हेच होय. आधुनिक मराठी कवितेत लौकिक विषयांना महत्त्व प्राप्त झाले आणि निसर्ग हा सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने स्वाभाविकपणेच विपुल प्रमाणात निसर्गचित्रण झाले. केशवसुतांनी केलेल्या काव्यविषयक क्रांतीमुळे मराठी कवितेत निसर्ग हा एक प्रधान विषय बनून गेला.

---

[१] डॉ. वि. ना. कुलकर्णी, मराठी ललित साहित्यातील निसर्ग, शिवाजी विद्यापीठ, नोव्हें १९७२, उपसंहार पृ. २

निसर्गकवी : बालकवी

आधुनिक मराठी कवितेतील प्राय: सर्व कवींनी निसर्गकविता लिहिलेल्या आहेत. केशवसुत संप्रदायातील केशवसुत, गोविंदाग्रज या कवींनी, चंद्रशेखरांनी, रविकिरणमंडळातील माधव ज्यूलियन आणि गिरीश यांनी, कुसुमाग्रज, बोरकरांनी आणि नवकवींतील मर्ढेकर, अनिल, मंगेश पाडगावकर, सदानंद रेगे यांनी आणि ना. धों. महानोर यांनी चांगल्या-पैकी निसर्गकविता लिहिलेल्या आहेत. मराठीतील निसर्गकाव्याचे क्षेत्र या व अन्य मराठी कवींनी पुष्कळच विस्तारले आहे, पण निसर्ग हाच ज्याच्या भावनेचे प्रधाने केंद्र बनलेला आहे असे दोनच कवी मराठीत आढळतात. ते म्हणजे बालकवी आणि ना. धों. महानोर या दोघांतही बालकवींचे स्थान अनन्य साधारण असे आहे. बालकवी म्हणजे मराठीतील खरा निसर्गकवी. निसर्गकवी हे बिरुद बालकवींच्या -मागे लावण्याबाबत कोणाचाही मतभेद नाही. " मराठी साहित्य समालोचनकार " म्हणतात, " बालकवी म्हणजे मराठी साहित्यातील सृष्टिदेवतेचे शाहीर"[१]. डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात, " देशभक्ती ही जशी विनायकाच्या कवितांची मुख्य प्रेरक प्रवृत्ती होती, त्याप्रमाणेच निर्मळ निसर्गप्रीती ही बालकवींच्या कवितांतील सौंदर्य निर्माण करणारी प्रमुख शक्ती होती. [२] श्री. कृ. बा. मराठे सांगतात की, बालकवींची "सृष्टिसूक्ते महाराष्ट्र कवितेच्या आधुनिक काळातील उपनिषदे " आहेत. [३] श्री. ग. त्र्यं. माडखोलकर सांगतात " बालकवी

---

[१] वि. सी. सरवटे, सी. ना. गवारीकर, मराठी साहित्य समालोचन खंड २ पृ. २० वे मराठी साहित्य परिषद इंदूर, १९३७, प्र. १.

[२] अ. ना. देशपांडे , आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, भाग१ पृ. व्हीनस , पुणे, १९७४ पृ. ३२६

[३] कृ. बा. मराठे , बालकवी, मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९६२ पृ. ६४

हे सृष्टीचे गायक होते".[१] अशा प्रकारे बालकवी म्हणजे निसर्गकवी असे समीकरण बहुसंख्य टीकाकारांनी मांडलेले आहे.

प्रो. भा. ल. पाटणकर यांनी संपादिलेल्या " बालकवीची समग्र कविता " या संकलनात बालकवींच्या एकूण १४२ कविता छापलेल्या आहेत. त्यातील साधारण ३५ अपूर्ण आहेत. श्रीमती पार्वतीबाई ठोंबरे यांनी " समग्र बालकवी " या संकलनात प्रो. पाटणकर यांच्या संग्रहात न आलेल्या प्रकाशित ६ कविता आणि शिवाय अप्रकाशित अशा बालकवींच्या १३ कविता छापलेल्या आहेत. या कवितांत निसर्गविषयक कवितांची संख्याच अधिक आहे. बालकवींची कविता म्हटल्यावर रसिकांना आठवतात त्या त्यांच्या निसर्गकविताच होत. "निर्झरास", "फुलराणी", "श्रावणमास", "बालविहग ", "अरुण", "पारवा", "औदुंबर", "खेडयातील रात्र ", "संध्यातारक" यांसारख्या बालकवींच्या निसर्गकविता रसिकांच्या ओठांवर आहेत. अशा निसर्गकवितांची रसिकप्रियताही निसर्गकवी या नात्यानेच बालकवींचे श्रेष्ठ स्थान स्पष्ट करते.

## हिंदीतील निसर्गकवी सुमित्रानंदन पंत

बालकवी हे जसे मराठीतील निसर्गकवी, तसेच सुमित्रानंदन पंत हे हिंदीतील " प्रकृतिकवी" म्हणजेच निसर्गकवी. हिंदी काव्यामध्येही, मराठीप्रमाणेच,आधुनिककाळी स्थित्यंतर झालेले आढळून येते. प्राचीन हिंदी कवितेत तसे पुष्कळ निसर्गचित्रण झालेले आहे. त्याचा आढावाही डॉ. किरणकुमारी गुप्ता, डॉ. खंडेलवाल, डॉ.ललताप्रसाद सक्सेना

---

[१] ग. त्र्यं. माडखोलकर , आधुनिक कविपंचक, पृ. १४८

आर्मदीपंडितांनी घेतलेला आहे, तथापि प्राचीन हिंदीतही परमार्थसाधन हे कवींनी आपले साध्य मानल्यामुळे साध्यरूप निसर्ग-चित्रण फारच थोडे आढळते. आ. महावीरप्रसाद व्दिवेदी यांच्या " सरस्वती " मासिकाने हिंदी कवितेत क्रांती घडवून आणली आणि साध्यरूपाने निसर्गचित्रण होऊ लागले. या निसर्गचित्रणाच्या दृष्टीने हिंदीतील " छायावाद" नामक संप्रदायाची मोलाची कामगिरी मानावी लागते. जयशंकरप्रसाद, सुमित्रानंदन पंत, सूर्यकांत त्रिपाठी "निराला " आणि महादेवी वर्मा हे छायावादाचे चार आधारस्तंभ होत. यांपैकी सुमित्रानंदन पंत यांना सा-या हिंदी जगताने "निसर्गकवी " म्हणून गौरविलेले आहे. डॉ. अवधबिहारी राय सुमित्रानंदन पंताना " निसर्गाचे सुकुमार कवी " मानतात, ते त्यांच्या-संबंधी लिहितात, " प्रकृति ही कविका घर है। इसकी काव्यशालामें " सुंदरम्"का अभिषेक है। सारी सृष्टि महोत्सव मना रही है।"[१]" आ. रामचंद्र शुक्ल सांगतात , " छायावादके भीतर माने जानेवाले सब कवियों में प्रकृति के साथ सीधा प्रेमसंबंध पंतजीका ही दिखायी पडता है।"[२] आणि सुमित्रानंदन पंतांच्या चरित्रकार श्रीमती शांति जोशी सांगतात, " प्रकृति पंत की आत्मामें समायी हुई है। वही उनका प्राण है।"[३] अशाप्रकारे हिंदी साहित्यात सुमित्रानंदन पंत म्हणजे निसर्गकवी असे बालकवींच्याप्रमाणे समीकरण प्रस्थापित झालेले आहे.

---

[१] डॉ. अवधबिहारी रॉय, पंत की काव्यगत मान्यताएँ और उनका काव्य , संजय बुक, वाराणसी, १९८० पृ. ११३

[२] शांति जोशी, सुमित्रानंदन-पंत जीवन और साहित्य, राजकमल, दिल्ली १९७०, पृ. २०३

[३] शांति जोशी, सुमित्रानंदनपंत जीवन और साहित्य, राजकमल, दिल्ली , १९७० , पृ. २०३

सुमित्रानंदन पंत यांचे अनेक काव्यसंग्रह प्रसिध्द झालेले आहेत. वीणा, ग्रंथि, पल्लव, गुंजन , ज्योत्स्ना , युगांत , युगवाणी , ग्राम्या, स्वर्णकिरण यांसारखे २० हून अधिक काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. सुमित्रानंदन पंतांनी अनेक विषयांवर काव्यरचना केलेली आहे, पण सुमित्रानंदन पंत हे नाव उच्चारताच हिंदी रसिकांना आठवतात ती त्यांची नितांतसुंदर रमणीय निसर्गगीतेच. 'पल्लव,' 'मधुकरी,' 'छाया,' 'चाँदनी,' 'मौननिमंत्रण,' 'नक्षत्र,' 'बादल,' 'एकतारा'," नौकाविहार," 'विहग के प्रति,' 'अप्सरा', यांसारखी त्यांची अनेक निसर्गगीते रसिकांच्या ह्दयावर ठसा उमटून गेलेली आहेत. हिंदी जगत सुमित्रानंदन पंतांना " प्रकृति के सुकुमार कवि " या वैशिष्टयानेच ओळखत आलेले आहे.

चरित्राविषयी थोडे फार ------

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत हे दोघे समकालीन निसर्गकवी. बालकवींचा जन्म १३ ऑगस्ट १८९० रोजी खानदेशातील धरणगाव येथे झाला. त्यांचे वडील पोलीस खात्यात नोकरीला होते. या नोकरीत वारंवार बदल्या होत असल्यामुळे बालकवींचे शिक्षण वेगवेगळया ठिकाणी झाले. एकप्रकारे त्यांच्या शिक्षणाची यामुळे अतिशय हेळसांड झाली. त्यामुळे आपण अमक्या शाळेचे विद्यार्थी म्हणून अभिमानाने सांगावे अशी शाळा त्यांना लाभलीच नाही. त्यांच्या मनावर शाळेचा असा संस्कार घडला नाही, परंतु या चार भिंतींत चिणलेल्या शाळेबाहेरच्या सृष्टीच्या विशाल विद्यालयात मात्र त्यांनी अपार विद्या संपादन केली. बालकवींच्या काव्यरचनेस १९०३ साली सुरवात झाली होती. प्रारंभी प्रारंभी त्यांनी जुन्या वळणाच्या ब-याच कविता लिहिल्या. या कवितांत त्यांचे लक्ष शब्दचमत्कृतीकडे अधिक होते. मोरोपंतांच्या मंत्ररामायणाचे अनुकरण

करीत त्यांनी काही आर्या लिहिल्या होत्या. आपल्या काही कवितांतून त्यांनी घरच्या मंडळींची नावेही गोवलेली आढळतात, पण लौकरच ते या अनुकरणाला कंटाळले, आणि काव्यविषयासाठी निसर्गाकडे वळले. जळगाव येथे डॉ. कीर्तिकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिले महाराष्ट्र कविसंमेलन भरले होते. या कविसंमेलनात बालकवींनी स्वकृत कविता मोठया धिटाईने म्हणून दाखविली. या संमेलनात त्यांना " बालकवी " ही पदवी आणि एक पागोटे व जरीकाठी उपरणे देऊन त्यांचा गौरव केला गेला. या संमेलनानंतर थोडयाच -काळात बालकवींचे वडील मरण पावले, आणि पुढे काय?, हा प्रश्न त्यांच्यापुढे दत्त म्हणून उभा राहिला. बालकवींचा १९०८ साली विवाह झाला. त्यानंतर ते शिक्षणासाठी नाशिकला गेले. नाशिक, एरंडोल, बडोदे, अहमदनगर, पुणे, महाबळेश्वर अशी बरीच भ्रमंती त्यांना करावी लागली, पण कवी बालकवींना या भ्रमंतीमध्ये वाड्मयीन लाभ मात्र पुष्कळच झाला. बडोद्याला गुर्जर कवी कलापी, यांच्या काव्याशी त्यांचा परिचय झाला. अहमदनगरला रे. टिळक आणि लक्ष्मीबाई यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते जडले. पुण्यामध्ये गोविंदाग्रजांची ओळख झाली. बालकवी नगरच्या मिशन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करीत होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत महाबळेश्वर येथे मिशनच्या लँग्वेज स्कूलमध्ये मराठी हा विषय शिकविण्यास ते जात असत. बहुतेक दर उन्हाळ्यात बालकवी तेथे शिकविण्याचे काम करीत. या महाबळेश्वरच्या सृष्टिसौंदर्याने बालकवी -वर अतिशय मोहिनी घातली होती. ५ मे १९१८ साली बालकवींना अपघाती मरण आले. भादली रेल्वेस्टेशनवर रेल्वेखाली त्यांना मृत्यू आला आणि अशात-हेने त्यांच्या २८ वर्षांच्या लौकिक आयुष्याची अकाली अखेर झाली.

सुमित्रानंदन पंत यांचा जन्म २० मे १९०० साली हिमालयातील कूर्मांचल प्रदेशातील कौसानी या गावी झाला. हे गाव म्हणजे हिमालयाच्या सुंदर कुशीत वसलेले एक सुंदर नंदनवनच आहे. या कौसानी गावी सुमित्रानंदन पंतांना आपल्या घराच्या अंगणातून त्रिशूल, नंदादेवीचे शिखर इत्यादी हिमालयाची उत्तुंग स्थाने सहज दिसत. पंतांचे प्राथमिक शिक्षण कौसानीच्या शाळेत झाले. अल्मोडा येथील गव्हर्मेंट हायस्कूल मध्ये त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. सुमित्रानंदन महाविद्यालयीन शिक्षणासाठी वाराणसी, प्रयाग येथे येऊन राहिलेल्या काळात"सुधाकर" "अल्मोडा अखबार " इ. मासिकांतून त्यांच्या कवितांचे प्रकाशन होऊ लागले, पण कवी म्हणून त्यांना खरी मान्यता मिळाली ती नोव्हें. १९११ मध्ये प्रयागच्या " म्योर " सेंट्रल कॉलिजमधील कविसंमेलनातच. " पल्लव " हा त्यांचा काव्यसंग्रह १९२६ मध्ये प्रसिध्द झाला, आणि छायावादाच्या प्रमुख आधारस्तंभांमध्ये त्यांची गणती होऊ लागली. इ. स. १९२९ मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले, आणि नंतर घोर आर्थिक संकटांनी आणि स्वजनांच्या विरहांनी पंतांचे आयुष्य संघर्षपूर्ण ठरले. सुमित्रानंदन पंतांचा मृत्यू २८ डिसेंबर १९७७ साली झाला.

श्री. कृ. बा. मराठे यांनी बालकवींचे, तर श्रीमती शांती जोशी यांनी सुमित्रानंदन पंतांचे चरित्र लिहिले आहे. या दोन कवींचा एकूण जीवनपट डोळ्यांसमोर यावा अशात-हेने, अनेक गोष्टींच्या तपशीलासह, त्यांनी ही चरित्रे रेखाटलेली आहेत. वरवर एक फरक लक्षात येतो, तो या दोघांना लाभलेल्या आयुर्मर्यादेचा! बालकवींना केवळ २८ वर्षांचे आयुष्य लाभले, तर सुमित्रानंदन पंतांची हयात ७७ वर्षांची झाली. या आयुर्मर्यादेच्या फरकामुळेच कदाचित, बालकवींची जीवनविषयक माहिती त्रुटित स्वरूपात मिळते, तर पंतांसंबंधीची माहिती विशेष विस्तृत आणि

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अधिक स्पष्ट अशी मिळते. आपले काव्य, त्याच्या प्रेरणा, काव्य-प्रवाहातील वाटा - वळणे, बदललेले दृष्टिकोण आदींबद्दल सुमित्रानंदन पंतांना स्वत:हून माहिती पुरवता आली. बालकवींच्या बाबतीत असे घडले नाही. वेगवेगळ्या व्यक्तींनी सांगितलेल्या हकिकती, पत्रे, ऐकीव गोष्टी यांच्या आधारे बालकवींचे चरित्र लिहिले गेले आहे, तर सुमित्रानंदन पंतांचे चरित्र त्यांच्या हयातीतच रेखाटले गेले आहे.

काव्यामागील प्रेरणा

कोणत्याही कृतीच्या मुळाशी कोणत्या-ना-कोणत्या प्रकारची प्रेरणा ही आढळतेच. या प्रेरणा विविधप्रकारच्या असू शकतात. कवीचा भौगोलिक प्रदेश, सामाजिक परिसर, घरचे वातावरण, वाङ्मयीन संप्रदाय, पूर्ववर्ती आणि समकालीन साहित्याचे अध्ययन अशा अनेक गोष्टींपासून कवींना प्रेरणा लाभत असते. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत हे समकालीन असे दोन कवी. दोघांचेही स्थान अग्रगण्य कवींच्या मालिकेत. दोघांनीही प्रामुख्याने निसर्गविषयक कविताच लिहिलेल्या आहेत. समान कालखंडातील, पण भिन्न भौगोलिक प्रदेशातील या दोन निसर्गकवींच्या काव्याचा तौलनिक अभ्यास अनेक दृष्टींनी उद्‌बोधक ठरणारा आहे. त्याहेतूनेच या लघुप्रबंधाचे लेखन झालेले आहे.

या काव्यप्रेरणांच्या दृष्टीने या दोन कवींचा विचार करता अनेक समान गोष्टी आणि थोडीफार भिन्नता आढळते.

निसर्गसहवास

बालकवी व सुमित्रानंदन पंत या दोघांचा जन्म कवी म्हणूनच झाला होता. आपला जन्म कविता करण्यासाठीच आहे, याची जाणीव या कवींना प्रारंभापासूनच होती. बालकवींना निसर्गातील "दिव्य - संगीत " लहानपणापासूनच ऐकू येत होते. श्री. र. श्री. देशपांडे यासंबंधीचे बालकवींचे मनोगत स्पष्ट करतांना म्हणतात, "सृष्टीची सौंदर्ये उकलून दाखविण्यासाठीच माझा जन्म आहे असे त्यांना नेहमी वाटत असे. तारकांचे संगीत मला नेहमी ऐकू येते. आकाशाची शोभा आणि जलाशयाची गति-स्थिती यातून मला सारखे संदेश येतात. ते सामान्य जनांसाठी सांगावे लागतात. म्हणून ते उतरून घेणे माझे कर्तव्य आहे. देवाने माझा अवतार त्यासाठीच घडविला आहे. स्वर्ग आणि मृत्यू यांच्यामधील सोपान म्हणजे पाऊस आहे, पौर्णिमा म्हणजे चंद्र-सौंदर्याचे प्रतीक आहे, असेच काही नाही, अष्टमीचा चंद्रही तितकाच मोहक असतो. अंधार आणि उजेड या दोहोंचा अनुभव अष्टमीच्या चंद्रात घेता येतो. म्हणून तो मला पौर्णिमेपेक्षाही आकर्षक वाटतो". [१] बालकवींनी सृष्टीतील हे " दिव्य संगीत " अनेक कवितांत अक्षरबध्द केलेले आहे. प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी म्हटल्याप्रमाणे बालकवी म्हणजे, स्वत्व मुठीत घेऊन आलेले कवी. "[२] बालकवींना लाभलेल्या या जन्मदत्त प्रतिभेचा सृष्टीतील सौंदर्याशी सुंदर मेळ जमला, त्यांना सृष्टीतील दिव्य संगीत ऐकू येऊ लागले आणि त्याचा सचेतन आविष्कार त्यांच्या काव्यात झाला.

---

[१] कृ. बा. मराठे, बालकवी, मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९६२ पृ. ९४-९५

[२] गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्र. आ. १९७७, पृ. ४५

सुमित्रानंदन पंत हे असेच जन्मजात कवी. आपल्या "कवि-कर्मा"-चे रहस्य स्वत: त्यांनीच सांगितले आहे. ते सांगतात, " माझ्या-मध्ये असे संस्कार अवश्य होते की, ज्यांनी मला कवि-कर्म करण्याची प्रेरणा दिली, परंतु या प्रेरणेच्या विकासासाठी स्वप्नांचा झोपाळा पर्वत प्रदेशातील दिगंत-व्याप्त नैसर्गिक शोभेनेच दिला. त्याने बालपणापासूनच आपल्या रुपेरी एकांतात, एकाग्र तन्मयतेच्या रश्मिदोलात, मला रिझवले कोमलकंठ वनपक्ष्यांच्या बरोबर बोलायला, कलरव करायला शिकवले".[१] [मराठी अनुवाद] बालकवींना सृष्टीतील " दिव्य संगीत " ऐकू येई, तर सुमित्रानंदन पंतांना " कवीच्या वाणीमध्ये नि:संदेह ईश्वरीय संगीत खेळते आहे." [२] असे वाटे .

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघेही जन्मजात कवी. दोघांच्या काव्यामागची निसर्गसौंदर्य हीच प्रबळ प्रेरणा. हे दोन्ही कवी निसर्गाच्या सहवासात वाढले आणि निसर्गसौंदर्यातच रमून गेले. दोघेही एकांताचे भुकेले होते, आणि या एकांतात दोघांनाही निसर्गाचा सहवास हवाहवासा वाटे. निसर्ग ही त्यांची सर्वप्रधान प्रेरणा होती. हे दोघे कवी एकांतप्रिय असले, तरी त्यांच्या एकांतप्रिय-वृत्तीची कारणे मात्र भिन्न भिन्न होती. बालकवींच्या " फुलराणी " नामक कवितांच्या संकलनास लिहिलेल्या प्रस्तावनेत डॉ. रा.शं. वाळिंबे यांनी बालकवींच्या एकांत-प्रियतेची मीमांसा केलेली आहे. संशयाने संभ्रांत झालेलेमन, अनेक गोष्टींनी आलेली उदासीनता व विषण्णता, ज्ञानाच्या विफलतेची झालेली जाणीव या सर्वांमुळे बालकवी एकांतप्रिय झाले अशी डॉ. वाळिंबे यांची एकूण मीमांसा आहे. ते लिहितात, " मानवी जीवनाची अपूर्णता, दु:खमयता ,

---

[१] सुमित्रानंदन पंत, रश्मिबंध [भूमिका] राजकमल, दिल्ली, नवाँ. सं. १९६६ पृ. ८

[२] डॉ. अवधबिहारी रॉय, पंत की काव्यागत मान्यताएँ और उनका काव्य, संजय, वाराणसी, पृ. ५८

विरूपता या गोष्टी कवीच्या मनाला सहन झाल्या नाहीत. आणि उलट निसर्गात त्याला स्थैर्य, परिपूर्णता, सौंदर्य व आनंद या गोष्टी दिसल्यामुळे मानवी जीवनाकडे पाठ फिरवून सौंदर्य व आनंद यांच्या प्राप्तीसाठी त्याला निसर्गाची उपासना करणे भाग पडले आहे. "[१] आपल्या नैराश्यपूर्ण वातावरणाचा विसर पडावा म्हणून कवी निसर्गाकडे धाव घेत असे व त्याच्या सौंदर्याची अमृतवृष्टी झाली म्हणजे तो धन्य होत असे, असे डॉ. वाळिंबे यांचे एकूण म्हणणे आहे.

बालकवी आपल्या जीवनातील नैराश्यपूर्ण वातावरणामुळे एकांतप्रिय बनले. जीवनातील कटु-कठोर अनुभवांनी त्यांच्यात एकांतप्रियता बळावली. सुमित्रानंदन पंतही एकांतप्रिय होते, परंतु त्यांच्या एकांतप्रियतेचे कारण त्यांचा मातृवियोग हे होते. ते सांगतात " माझ्या आईचा मृत्यू माझ्या जन्मानंतर अवघ्या सहा-सात तासांच्या आतच झाला. परंतु आईची उणीव कौसानीने भरून काढली. आईच्या कुशीपेक्षाही कौसानीची कूस मला अधिक प्रिय झाली. "[२] अशाप्रकारे मातृवियोगाने सुमित्रानंदन पंतांना सृष्टीच्या सान्निध्यात नेले. सुमित्रानंदन पंत सांगतात, " मी निसर्गाच्या कुशीत जन्माला आलो, याच निसर्गाच्या अंगणात खेळलो, बागडलो आणि मोठा झालो. ही सृष्टी साधारण नव्हती, तर विराट, शुभ्र, शांत हिमालयाची जवळीक असलेली होती. "[३] अशाप्रकारे निसर्गसौंदर्य ही या दोन्ही कवींच्या काव्यामागील बलवत्तर प्रेरणा आहे. दोघेही भिन्न भिन्न कारणांनी निसर्गाच्या सहवासात गेले, आणि निसर्गसौंदर्याशी तदाकार झाले.

---

[१] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी, [प्रस्तावना], कॉन्टिनेन्टल प्र, पुणे, प्र. आ, १९८६ पृ. ११

[२] सुमित्रानंदन पंत, साठवर्ष एक रेखांकन, पंतग्रंथावली भाग ६, राजकमल दिल्ली, १९८० पृ. २२४

[३] सुमित्रानंदन पंत, साठ वर्ष एक रेखांकन, पंत ग्रंथावली भाग ६, राजकमल दिल्ली, १९८०, पृ. १४३

8722
A

वाङ्मयीन संप्रदाय :-

बालकवी केशवसुत संप्रदायातील कवी, तर सुमित्रानंदन पंत " छायावाद " नामक हिंदी साहित्यातील एका संप्रदायाचे आधारस्तंभ. या संप्रदायांचा त्यांच्यावर कमीजास्त प्रमाणात प्रभाव असलेला दिसून येतो. १८८५ नंतर मराठी कवितेच्या आंतरबाहय स्वरूपात मोठी क्रांती घडून आली. केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेचा चेहरामोहराच बदलून टाकला. मराठी कवितेला अनेक लौकिक विषय प्राप्त झाले आणि साध्या विषयातही मोठा आशय व्यक्त होऊ लागला. काव्यविषया-पेक्षा कवीच्या तीव्र अनुभूतीला महत्त्व प्राप्त झाले. कवितेला आत्म-निष्ठेची जाण आली, आणि त्याबरोबरच अभिव्यक्तीची नवनवीन रूपे तिने स्वीकारली. मराठी कवितेत केशवसुतांनी केलेल्या या क्रांतीचा उलगडा करीत प्रा. रा.श्री. जोग लिहितात, " पूर्वी स्फुट काव्य अल्प, आता तेच फार, पूर्वी मात्रावृत्तात्मक काव्य कमी, आता तेच पुष्कळ, पूर्वी लौकिक विषय कमी, आता बहुधा तेच दिसतात, पूर्वी काव्य हे भक्तीचे साधन होते, आता भक्ती बहुतेक उरलीच नाही, पूर्वी आत्मलेखन फार थोडे, आता तेच जिकडेतिकडे भरलेले, असा सारा प्रकार उलटा झाल्यावर या घटनेला क्रांती म्हणावयाचे नाही तर काय म्हणावयाचे?"[१] केशवसुतांनी मराठीकाव्यात क्रांती केली या बद्दल आता फारसा मतभेद उरलेला नाही. केशवसुतांनी मराठी कवितेलाही जी नवी दिशा दाखवली त्या दिशेने रे. टिळक, विनायक, गोविंदाग्रज आणि बालकवी हे वाटचाल करीत राहिले.

---

[१] रा.श्री. जोग, केशवसुत काव्यदर्शन, प्र. के. भि. ढवळे, मुंबई, प्र.आ. १९४७, पृ. ३९

बालकवींच्या कवितेवर केशवसुतांचा थोडाफार प्रभाव निश्चित -पणे आहे. केशवसुतांबद्दल बालकवींना मोठा आदर होता. केशवसुत हे त्यांचे कविदैवत होते. त्यांच्यावर ते निस्सीम प्रेम करीत. श्री. कृ. बा. मराठे सांगतात की, एखाद्या अरसिक अगर अहंमन्य मनुष्याने केशवसुतांस अगर त्यांच्या कवितेस चुकून वा जाणूनबुजून दोष दिला, तर बालकवींना तो खपत नसे. या संबंधात त्यांनी उजगरे यांच्या आठवणीची नोंद केली आहे. एका अहंकाराने पछाडलेल्या कवीने बालकवीसमक्ष " केशवसुत एक बेअकली कवी होता", असे विधान केले. ते ऐकून बालकवी रागाने लाल झाले आणि म्हणाले, " अरे, तो महाकवी आहे. कवींचा राजा आहे. देव आहे देव! त्याने आपल्या श्वासागणिक काव्याचे फवारे उडवले आहेत. त्याने ख-या काव्याचा दीप उजळला आहे, म्हणून तुमच्यासारख्या कविबाळांना निदान चाचपडता तरी येते. ज्याने प्रेमाचे बीजारोपण करून महाराष्ट्राला ख-या प्रेमाची कल्पना आणून दिली, ज्याने शून्यातून विश्व निर्माण केले, नसत्या -तून असतेपणा दाखविला, त्या महादेवाला तुम्ही मूर्ख लोक दोष देता याला काय म्हणावे ? त्यांच्या कवितेची दिव्य दृष्टी तुमच्या डोळ्यांना येण्या- -साठी, त्यांच्या कवितेचे मोजमाप करण्यासाठी अंगी पात्रता यावी म्हणून तुम्हांला सात जन्म तरी आणखी घालवावे लागतील. तोपर्यंत त्यांच्या कवितेचा दीप मात्र तुम्ही मालवू नका."[२] बालकवींची इतकी अनन्य निष्ठा दुस-या कोणत्याही कवींवर नव्हती.

केशवसुतांची कविता आणि बालकवींची कविता यांत अनेक साम्य स्थले आहेत. केशवसुतांप्रमाणे बालकवींचाही कवी आणि कविता यांच्या सामर्थ्याबद्दल मोठा विश्वास होता. " आम्ही कविलोक देवांचे लाडके

---

[२] कृ. बा. मराठे, बालकवी, मौज प्रकाशन, मुंबई, पृ. आवृत्ती, १९६२, पृ. ७५.

आहोत" असे केशवसुत सांगतात तर, "आम्ही देवाचे पंचीप्राण" आहोत, अशी बालकवी त्यांची री ओढतात. " प्रकाश गेला तिमिर हरपला " या केशवसुत--वर्णित अवस्थेप्रमाणेच " तेज हरपले तम मालवले " अशी स्थिती बालकवी वर्णितात. केशवसुतांच्या " तुतारी " वरून बालकवींची " धर्मवीर " ही कविता निर्माण झाली. केशवसुतांनी सांगितलेली " प्रौढत्वी निज शैशवास जपण्याची " वृत्ती बालकवींच्या अंगोपांगांत मुरलेली आढळते. प्रा. दि. के. बेडेकरांनी " केशवसुतांची काव्यदृष्टी " या आपल्या प्रबंधात केशवसुतांच्या कवितांतून व्यक्त होणारा स्वर्गसमधतेच्या कल्पनेचा विचार विस्ताराने मांडलेला आहे. पृथ्वीवर स्वर्ग आणण्याची ही कल्पना बालकवींच्याही काही कवितांत व्यक्त झालेली आहे. " फुलराणी ", " शारदीय सौंदर्यदेवता" " सुकलेली फुले " या कवितांत ही कल्पना आलेली आहे. " बालकवींची कविता आणि केशवसुतांची कविता यांतील काही साम्य स्थळे शोधून काढता येतील . डॉ. माधवराव पटवर्धनांनी तसा प्रयत्नही केलेला आहे.

बालकवी केशवसुत संप्रदायात बसतात यात शंका नाही, तथापि त्यांची कविता पूर्णपणे केशवसुती संप्रदायातील कविता आहे असे म्हणता येणार नाही. ओजस्विता ही केशवसुतांच्या कवितेची स्वाभाविक वृत्ती होती, तर बालकवींना सृष्टीतील माधुर्याचे आणि सौकुमार्याचे वेड होते. निसर्गातील दिव्य आणि विलोभनीय सौंदर्याचे त्यांना आकर्षण होते. बालकवींच्या कवितामागची फार मोठी प्रबळ प्रेरणा निसर्गाची होती. वृक्षाला जितक्या सहजतेने पालवी फुटावी, तितक्या सहजतेने बालकवींची निसर्गकविता जन्माला आलेली आहे. केवळ बोधाच्या, मार्गदर्शनाच्या, तत्त्वविवरणाच्या दृष्टीने बालकवींचे मन निसर्गाकडे वळले नव्हते. बालकवी निसर्गाशी एकरूप झाले होते. आपल्या : कवितेत आपली आवड व्यक्त करीत बालकवी म्हणतात,

" सौंदर्य फुलांचे , गाणी वनविहगांची
ती गोड शांतता हिरव्या वृक्षलतांची
शीतलता सुंदर चंचल निर्झरणींची
गंभीरपणाची मूर्ती गिरिरायाची "

केशवसुत समाजरूपी धोंडयाला उलथून देण्यासाठी उपयोगी पडणारी अवजड पहार या दृष्टीने काव्याकडे पाहात, याउलट बालकवी "मी-तू पण क्षणात विसरवून टाकणारी " गोष्ट यादृष्टीने काव्याकडे बघत. केशवसुतांचा पिंड हा विचार-प्रवण, तर बालकवींचा भावनाप्रवण,. विचारापेक्षा भावनेत आणि वास्तवापेक्षा स्वप्नसृष्टीत बालकवी अधिक रमत, त्यामुळे बालकवी केशवसुत संप्रदायात मोडत असले तरी, त्यांच्या कवितेने आपले निराळेपण सिध्द केले आहे. डा. रा. शं. वाळिंबे लिहितात, " बालकवी जरी "तुतारी " मंडळात सामील झालेले होते, तरी काव्याच्या प्रयोजना--विषयी केशवसुतांनी ठिकठिकाणी जे विचार स्पष्टपणे प्रकट केले आहेत ते विचार त्यांच्या मनोवृत्तीशी जुळणारे नव्हते. केशवसुतांची काव्य - विषयक कल्पना व बालकवींची काव्याची कल्पना यांत महदंतर आहे हे सहज सिध्द करता येईल. "[१]

## सुमित्रानंदन पंत आणि छायावाद -

हिंदी साहित्यामध्ये १९२० च्या सुमारास एक नवी काव्यप्रवृत्ती उदित झाली. ती छायावाद म्हणून ओळखली जाते. " छायावाद " या नामकरणाबाबत, तसेच त्याच्या स्वरूपाबाबत पंडितांमध्ये मोठाच

---

[१] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी, [प्रस्तावना], कॉन्टिनेन्टल, पुणे प्र. आ. १९८६, पृ. ५३-५४.

मतभेद आहे. छायावादाची व्याख्या मोठमोठया पंडितांनी अगदी वेगवेगळ्या प्रकारची केलेली आहे. डॉ. शिवकुमार शर्मा लिहितात, " छायावाद काय आहे, या विषयाबाबतीत हिंदी साहित्यात विव्दानांनी इतके अधिक लिहिले आहे की, विभिन्न विव्दानांनी छायावादाच्या दिलेल्या व्याख्या वाचून साधारण वाचकाचा गोंधळच गोंधळ व्हावा."[१] [ मराठी अनुवाद ] छायावादाच्या वेगवेगळ्या व्याख्यांचा समावेश होईल अशा त-हेची एक व्याख्या डॉ. गणपतिचंद्र गुप्त यांनी दिली आहे. ते लिहितात, " भारतीय काव्यपरंपरामें हिंदी-कविता की छायावाद धारा अपने पूर्ववर्ती युग की प्रतिक्रिया में प्रस्फुटित एक विशेष भावात्मक दृष्टिकोण, एक विशेष दार्शनिक अनुभूति और एक विशेष शैली है, जिसमें लौकिक प्रेम के माध्यमसे अलौकिक प्रेम के व्याज से लौकिक अनुभूतियों का चित्रण है। जिसमें प्रकृति का मानवीकरण है, वेदना की विवृत्ति है, सौंदर्य चित्रण है, गीति-तत्त्वों की प्रमुखता है और जिसके व्यक्तिवाद के स्व में सर्व सन्निहित है। " [२]

आधुनिक हिंदी साहित्यामध्ये छायावादाचे स्थान महत्त्वपूर्ण आणि मौलिक असे आहे. या छायावादामध्ये वैयक्तिकता, श्रृंगारभावना, सौंदर्यानुभूती, निसर्गप्रीती आणि निसर्गाचे मानवी- - करण , वेदना आणि कारूण्याचे आधिक्य, अज्ञात सत्तेबद्दलचे कुतूहल, स्त्रियांबद्दल उदार दृष्टिकोण, जीवनदर्शन, आणि क्रांतिकारक अभि- -व्यंजनाशैली ही वैशिष्टये प्रामुख्याने आढळून येतात. निसर्गप्रीतीचा आणि छायावादाचा घनिष्ट संबंध आहे. छायावादाच्या काही व्याख्या ही गोष्ट स्पष्ट करणा-या आहेत. श्री. रामकृष्ण शुक्ल, "निसर्गामध्ये व्यक्तीचे, मानवी जीवनाचे प्रतिबिंब पाहण्याची पध्दती म्हणजे छायावाद

---

[१] डॉ. शिवकुमार शर्मा, हिंदी साहित्य युग और प्रवृत्तियाँ, अशोक प्र. दिल्ली , १० सं. १९८६, पृ. ४९५

[२] — " — " — " — " — " — " — " — " — पृ. ४९८

होय."[१] [मराठी अनुवाद ] अशी छायावादाची व्याख्या देतात. निसर्गाच्या मानवीकरणाला छायावाद मानणारे अनेक समीक्षक आहेत. "जिसप्रकार परमात्माके प्रति प्रणय रहस्यवाद है, इसीप्रकार प्रकृति के प्रति प्रणय छायावाद है।" अशात-हेच्या छायावादाच्या व्याख्या हिंदीमध्ये मिळतात. महादेवी वर्मा सांगतात की " छायावादने मनुष्य के हृदय और प्रकृति के उस संबंध में प्राण डाल दिये, जो प्राचीन काल से बिंब-प्रतिबिंबके रूपमें चला आ रहा था .........। [२]

प्रसाद , पंत, निराला आणि महादेवी वर्मा हे छायावादाचे प्रमुख आधारस्तंभ. या चौघांच्या कवितांत निसर्गचित्रणाची असंख्य उदाहरणे मिळतात, त्यामुळेच निसर्गचित्रणाला छायावादाचा प्राण समजण्यात आले आहे. निसर्गाचे मानवीकरण अथवा निसर्गावर मानवी व्यक्तित्वाचा आरोप छायावादाची एक प्रमुख प्रवृत्ती आहे. या छाया-वादी कवींनी अनेक रूपांमध्ये निसर्गाचे दर्शन घेतले आहे. कधी त्यांनी प्रेयसीच्या रूपात निसर्गचित्रण केले आहे, तर कधी निसर्गामध्ये अज्ञात सत्तेची झलक पाहिली आहे. अधिकांश छायावादी कवींनी निसर्गाच्या कोमल , सुंदर , रूपाचेच चित्रण केलेले आढळते. सुमित्रानंदन पंत हे छायावादी कवी असल्यामुळे त्यांच्या कवितेतही निसर्गाचे मानवीकरण आधिक्याने आढळते. ते गंगानदीचे नारीरूपातच चित्रण करतात. त्यांची गंगा नुसती नदी नसते, तर ती एक सुंदर नारी असते -

" सैकत शैय्या पर दुग्ध धवल, तन्वंगी गंगा ग्रीष्म विरल,
लेटी श्रांत क्लांत निश्चल।

---

[१] डॉ. गोविंदराम शर्मा, हिंदी साहित्य और उसकी प्रमुख प्रवृत्तियाँ रीगल बुक डेपो, दिल्ली , द्वि. सं. १९६८, पृ. ३४७

[२] डॉ. शिवकुमार शर्मा, हिंदी साहित्य युग और प्रवृत्तियाँ, अशोक प्र. दिल्ली, १० वॉ. सं., १९८९ , पृ. ४९७.

तापस-बाला-सी गंगा कल, शशिमुख से दीपित मृदु करतल,
लहरें उर पर कोमल कुंतल। "

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्यातील एक फरक येथेच लक्षात येतो. बालकवींवरील केशवसुतांचा प्रभाव मान्य करूनही बालकवींच्या कवितेची एक स्वतंत्र सत्ता आहे हे चटकन् लक्षात येते. केशव--सुतांच्या निसर्गविषयक दृष्टिकोणापेक्षा बालकवींच्या कवितेची जात काही वेगळी आहे हे लक्षात यावयास वेळ लागत नाही. याउलट सुमित्रानंदन पंतांची छायावाद काळातील कविता ही प्राय: छायावादी वैशिष्ट्यांनी युक्त अशी आढळते. याकाळातील सुमित्रानंदन पंतांच्या कवितेचे छायावादी दृष्टिकोणातून वर्गीकरण, विश्लेषण करता येते आणि टीकाकारांनी ते तसे केलेलेही आहे. पंतांच्या कवितेत छायावादा--च्या उतरत्या काळात काही वेगळेपण येऊ लागले आणि पुढे कालौघामध्ये तिने नवीन वाटा, नवीन वळणे स्वीकारल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

## सामाजिक प्रेरणा

सुमित्रानंदन पंत आणि बालकवी या दोघांमध्ये सामाजिक प्रेरणेच्या दृष्टीने चटकन् फरक आढळतो. बालकवींची कविता सामाजिक प्रेरणेपासून प्राय: अलिप्त आहे. मानवीजीवनाचे ध्येय काय असावे, हे ध्येय मानवाला प्राप्त करून घेता यावे याकामी कवीचे कर्तव्य कोणते, आमचा भविष्यकाळ कसा असेल -- इत्यादी अनेक गोष्टींविषयी बालकवी अगदी मुग्ध आहेत. बालकवींनी निर्मिलेल्या कल्पनात्मक सृष्टीचा आपल्या जगताशी फारच थोडा संबंध दिसून येतो. १९१४ ते १९१८ याकालखंडात पहिले जागतिक महायुध्द झाले, पण या युध्दाच्या वणव्याच्या ज्वालांचा पुसटसा उल्लेख त्यांच्या कवितांत नाही. " धर्मवीर " या कवितेचा वास्तव जगाशी

थोडाफार संबंध आहे हे खरे, परंतु ही कविता अनुकरणपर अशी आहे आणि तिच्यात उत्कटतेचा अभाव आढळतो. भोवतालच्या समाजातील राजकीय अथवा सामाजिक चळवळीच्या बाबतीत बालकवी अलिप्त होते, असे म्हणणेच वास्तवाला धरून होईल. बालकवींच्या कवितांत काही दु:खे आहेत, पण ती त्यांची स्वत:ची दु:खे आहेत, समाजाच्या दु:खाचा विचार बालकवींच्या कवितेत येत नाही. सुमित्रा--नंदन पंतांच्या काव्यात मात्र तत्कालीन सामाजिक, राजकीय विचारांचा ठसा निश्चितपणे आढळतो. "पल्लव " मधील "परिवर्तन" ही कविता त्यांच्या कवितेचे वेगळे वळण दर्शविते. या कवितेत कवी सामाजिक परिवर्तनाचा आग्रह धरताना दिसतो. तसेच जीवनाच्या अनित्य वास्तविकतेतून नित्य अशा सत्याच्या शोधाचा प्रयत्नही तीमध्ये आहे. सुमित्रानंदन पंतांच्या ब-याच कविता वैयक्तिक पातळीवर न राहाता सामाजिक पातळीवर पोचलेल्या आढळतात. वास्तव सामाजिक अवस्थेबद्दल असंतोष व्यक्त करणा-या काही कविता त्यांनी लिहिल्या आहेत. " युगान्त " या त्यांच्या काव्यसंग्रहात तर क्रांति--भावनेचा आवेश आणि नवमानवा-बद्दलचा संकेत व्यक्त झाला आहे. " गा, कोकिल, बरसा पावक कण , नष्ट-भ्रष्ट हो जीर्ण पुरातन " असे सांगून ते " रच मानवके हित नूतन मन, हो पल्लवित नवल मानवपन" अशी अपेक्षा व्यक्त करतात. पंतांच्या कवितेत अशी सामाजिकता आहे, क्रांतिभावना आहे आणि मानवतावादाची उत्कट इच्छाही आहे. त्यांची " बापू के प्रति " ही कविता गांधीवादाकडील त्यांचा ओढा स्पष्ट करणारी आहे. "युगवाणी " आणि " ग्राम्या " या संग्रहांत मार्क्सवादी विचारधारा स्पष्टपणे आढळते आहे. थोडक्यात, सुमित्रानंदन पंतांच्या कवितेची समाज ही प्रेरणा अगदी स्पष्ट आहे. या उलट सामाजिकबाबतीत बालकवींची कविता प्राय: अलिप्त अशी आहे.

वाङ्मयीन परिशीलन - कवींची सोबत

बालकवी बहुश्रुत होते. ज्ञानेश्वरीचा आणि मोरोपंतांच्या कवितांचा त्यांनी अभ्यास केलेला होता. त्यांना अमृतरायाचे कटाव तालासुरावर म्हणण्याचा नाद होता. श्री. दूधभांडेशास्त्री यांच्याकडे बालकवींनी संस्कृत भाषेचे आणि साहित्याचे अध्ययन केले होते. अमेरिकन मिशनच्या युनियन ट्रेनिंग स्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करतांना त्यांनी वर्ड्‌स्वर्थ, शेली, कीट्स यांच्या काव्याचा अभ्यास केलेला होता आणि त्यांच्या कांही कवितांचे अनुवादही केले होते. शेलीच्या " स्कायलार्क " या कवितेचा त्यांनी सुंदर अनुवाद केला आहे. बालकवींच्या अनेक कवितांवर इंग्रजी काव्याचा असलेला प्रभाव त्यांचे चरित्रकार कृ. बा. मराठे यांनी दाखवून दिला आहे.

बालकवींना अनेक कविमित्रांचा सहवास लाभलेला होता. रे. टिळकांचे तर त्यांना याबाबतीत मोठे मार्गदर्शन लाभलेले होते. रे. टिळकांनी काव्यरचनेच्या बाबतीत बालकवींना केवढेतरी उत्तेजन दिले आणि इंग्रजी साहित्याच्या आस्वादाची गोडी लावली. बालकवींच्या मृत्यूनंतर रे. टिळकांनी " महाराष्ट्राचा बालकवी " या नावाने एक लेख मासिक " मनोरंजन " मध्ये लिहिलेला आहे. या लेखात कवी म्हणून बालकवींची कशी जडणघडण झाली हे दाखवून दिले आहे. उपरोक्त लेखात रे. टिळक लिहितात, " पण ते गेले! त्यांच्या निर्याणासंबंधाने आम्हांस एक अक्षरही लिहवत नाही. भयंकर ताप येऊन बेहोष असतांना-सुध्दा ज्याला आपल्या आईबरोबर लक्ष्मीबाईंचे [आमच्या पत्नीचे] स्मरण होत होते, ज्याला आमच्या मुलांचा हक्क तोच आम्हांसंबंधाने आपला हक्क वाटत होता, आमच्या हातचे असते तर आपला जीव गहाण ठेवून ज्याला आम्ही मृत्यूच्या हातून सोडवले असते, त्या आमच्या परमप्रिय बालकवीच्या

निधनाचे वर्णन सध्या तरी आम्हांस करवत नाही."[१] या उता-या-वरून रे. टिळक आणि लक्ष्मीबाई यांचे बालकवींशी असलेले स्नेहसंबंध स्पष्ट व्हावयास हरकत नाही. ठोंब-यांना टिळकांचे घर आपलेसे वाटे. टिळकांना आणि लक्ष्मीबाईंना ते मुलाप्रमाणे होते. "वनवासी" कवींच्या संगतीत ठोंब-यांनी वर्ष सहा महिने काढले होते. त्याकाळात त्यांनी जुन्यानव्या कवींचे अध्ययन केलेले दिसते. यावेळीच केशवसुतांच्या कवितेशी त्यांचा परिचय झाला आणि येथूनच केशवसुत संप्रदायाशी त्यांचा संबंध जोडला जाऊ लागला. बालकवी " तुतारी " मंडळाचे सदस्यही बनले. गडक-यांशी त्यांचा संबंध पुण्यात १९११ साली आला आणि उत्तरोत्तर तो वाढीला लागला. गोविंदाग्रज आणि बालकवी यांच्यातील अकृत्रिम स्नेहाच्या आठवणी अनेकांनी सांगितलेल्या आहेत. " ठोंबरे नसते तर मी फारशा कविता लिहिल्या नसत्या " असे गडकरी कधी कधी म्हणत असल्याचा निर्वाळा आ. अत्रे यांनी दिला आहे. बालकवी केशवसुत संप्रदायातील एक कवी. त्यांना वनवासी, रे. टिळक, लक्ष्मीबाई टिळक, गोविंदाग्रज यांचा सहवास लाभला. बडोद्याला गुर्जर कवी कलापीच्या कवितेशी त्यांचा परिचय झाला. संस्कृत साहित्याचा आणि प्राचीन मराठी कवितेचा त्यांनी अभ्यास केला. या सा-यांचा थोडाफार परिणाम बालकवींच्यावर झाला असेल तर तो नाकारण्याचे कारण नाही, परंतु बालकवींची कविता हे प्रभाव होते म्हणून निर्माण झाली असे म्हणता येणार नाही. कारण बालकवींच्या कवितेची विशिष्टता अगदी स्पष्ट आहे. केशवसुत संप्रदायात राहूनही बालकवींची कविता स्वतंत्र रीतीने वाढली आणि अन्य काही कवींचा प्रभाव पडूनही ती त्या प्रभावा--पासून मुक्त राहिली.

सुमित्रानंदन पंतांच्या घरचे वातावरणच साहित्यिक प्रवृत्तीचे होते. संस्कृतमधील मेघदूत, शाकुंतल, ऋतुसंहार आदी कलाकृतींचा लहान--पणीच त्यांनी अभ्यास केला होता. त्यांच्या वडील बंधूंच्याकडून संस्कृत

---

[१] कृ. बा. मराठे, बालकवी, मौज प्र. मुंबई, प्र. आ. १९६२, पृ. ६०.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

भाषेचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. अल्मोडा येथील वास्तव्यात श्री. गोविंदवल्लभ पंत, श्री. इलाचंद्र जोशी, भैरवदत्त पंत, इ. लेखकांशी त्यांचा परिचय झाला होता. पंतांच्या शालेय कालातील व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करतांना इलाचंद्र जोशी लिहितात, " या बालकवीची सुकुमार मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर तरळते आहे. माझ्या शालेयजीवनात या सुंदर स्वप्नाळू डोळ्यांनी मी एका अज्ञात, रहस्यमय विश्वाकडे सक्तीने खेचला जात असे."[१] [मराठी अनुवाद] वाराणसी येथील जयनारायण हायस्कूल-मध्ये शिकत असतांना रवींद्रबाबूंचे त्यांना दर्शन झाले आणि त्यांच्या मनात कवि-कर्माबद्दल आस्था निर्माण झाली. " विश्वसम्मानित होण्याइतका कवी मोठा होऊ शकतो, " असा आत्मविश्वास त्यांच्या मनामध्ये निर्माण झाला.[२] १९२५ साली हिंदू बोर्डींग हाऊसमध्ये त्यांची मैथिलीशरण गुप्तांशी भेट झाली आणि आर्यसभ्यतेचे प्रतीक असलेल्या एका महाकवीचे त्यांना दर्शन घडले.

वाडमयीन परिशीलनाच्यादृष्टीने सुमित्रानंदन पंतांचे महाविद्यालयीन जीवन महत्त्वाचे ठरले. याकाळात हरिऔध, मैथिलीशरण गुप्त यांसारख्या प्रथितयश हिंदी कवींचे काव्य त्यांच्या वाचनात आले. मिशन स्कूलचे प्रिंसिपल मिस्टर हिल यांच्यामुळे त्यांची बाइबलशी ओळख झाली. प्रयाग येथील म्योर सेंट्रल कॉलेजात प्रो. शिवाधार पाण्डे यांनी त्यांना इंग्रजी साहित्याची गोडी लावली. टॉलस्टाय, शेली, वर्ड्सवर्थ, टेनिसन, कीट्स् यांच्या कलाकृतींचे त्यांनी सूक्ष्म अध्ययन केले. त्यांच्या काव्य-निर्मितीला हे अध्ययन बरेचसे पोषक ठरले. स्वत: सुमित्रानंदन पंत लिहितात, " बाइबल मधील प्रेमासक्ती, कीटस्चे शिल्पवैभव, शेलीची सशक्त कल्पना, वर्ड्सवर्थचे निसर्गप्रेम, कॉलरिज-टेनिसन यांचे ध्वनिबोध यांमुळे माझी कविता पुष्ट, व्यापक आणि सूक्ष्म झाली."[३] [मराठी अनुवाद]

---

[१] शांति जोशी, सुमित्रानंदन पंत जीवन और साहित्य, राजकमल, दिल्ली प्र.सं. १९७० पृ. ८७

[२] - - पृ. ११७

[३] सुमित्रानंदन पंत, साठवर्ष एक रेखांकन, सुमित्रानंदन पंत ग्रंथावली भाग ६, राजकमल, दिल्ली, १९८०, पृ. १५३.

शालेय कालातच रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. स्वामी सत्यदेवजी यांच्यामुळे हिंदी साहित्याचे अध्ययन करण्याची आणि काव्यसृजनाची त्यांना विशेष प्रेरणा लाभली. यासर्व अध्ययनांचा व प्रभावांचा कळत - नकळत परिणाम सुमित्रानंदन पंतांच्यावर झाल्याचे दाखवून देता येते.

निष्कर्ष -

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघांनी बालवयातच काव्यलेखनाला प्रारंभ केला. त्यांच्या काव्यालेखनामागे असलेल्या प्रेरणांचा तौलनिक विचार करता खालील निष्कर्ष निघतात. -

[१] निसर्ग ही दोघांच्याही काव्यामागील बलवत्तर अशी प्रेरणा. दोघांनाही निसर्गसहवासाची विलक्षण आवड आणि दोघेही निसर्गसौंदर्यात हरवून जाणारे. निसर्गसौंदर्य ही त्यांच्या काव्याची मूलभूमी होय याबद्दल कोणाचेही दुमत नाही.

[२] बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांचा समावेश विशिष्ट वाङ्मयीन संप्रदायात केला जातो. बालकवींना केशवसुत संप्रदायातील कवी मानले जाते, पण या संप्रदायाचा बालकवींच्यावर झालेला परिणाम अगदीच क्षीण आहे. केशवसुत आणि बालकवी या दोघांच्या व्यक्तिमत्त्वात मूलगामी विरोध आहे. सामाजिक अन्यायाच्या बाबतीत केशवसुतांची लेखणी जशी जळफळून उठताना दिसते, तसा प्रकार बालकवींच्या कवितेच्या बाबतीत आढळून येत नाही. केशवसुतांना ओजस्वितेचे आकर्षण, तर बालकवींना सुकुमारतेचे आकर्षण, असा फरक असल्यामुळे काही समीक्षक बालकवींना केशवसुत संप्रदायातील कवी मानावयास तयार नाहीत. डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात , " बालकवींचा केशवसुतांच्या संप्रदायात समावेश करणे सर्वस्वी

असयुक्तिक आहे".[१] एवढे खरे की, बालकवींची कविता केशवसुती संप्रदायाहून बरीच वेगळी आहे. याउलट सुमित्रानंदन पंतांची कविता छायावादाच्या प्रभावाने भारलेली आहे. छायावादाचे प्रधान विशेष सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत ठळकपणे आढळतात.

[३] सामाजिक प्रेरणेचा विचार करता बालकवींची कविता या प्रेरणेपासून प्राय: अलिप्त अशी दिसते. डॉ. रा. शं. वाळिंबे लिहितात " बालकवींच्या काव्यविषयक कर्तबगारीला सुरवात होण्यापूर्वी वीस-पंचवीस वर्षे महाराष्ट्रात फार मोठी वैचारिक क्रांती सुरु झाली होती , व त्या क्रांतीची विविध स्वरूपे बालकवींच्या आसपास अमर्याद प्रभाव दाखवीत होती. आपल्याभोवती घडत असलेल्या या प्रभावी घटनांपासून बालकवी मात्र सर्वस्वी अलिप्त राहिले. समाजात केवढी मोठी वैचारिक क्रांती घडत आहे, याचा पुसट देखील विचार त्यांच्या मनात आला नाही."[२] निसर्गाच्या सौंदर्याचा जितका साक्षात्कार करून घेता येईल, तितका घ्यावा आणि निसर्गात ओतप्रोत भरलेल्या आनंदाचा जेवढा अंश प्राप्त करून घेता येईल, तितका घ्यावा एवढेच मानवाचे कर्तव्य होय अशी बालकवींची समजूत असावी. सुमित्रानंदन पंतांनी निसर्गसौंदर्याचा निश्चितपणे साक्षात्कार करून घेतला आहे, निसर्गात ओतप्रोत भरलेल्या आनंदाचा भरपूर अंश प्राप्त केला आहे, परंतु एवढेच त्यांनी मानवाचे कर्तव्य मानलेले नाही. त्यांच्या कवितेला एक सामाजिक दृष्टी लाभलेली आहे. आजूबाजूच्या दारिद्र्याचे, विषमतेचे चित्र त्यांच्या कवितेत आलेले आहे. सामाजिक प्रेरणेच्या दृष्टीने सुमित्रा-नंदन पंतांची कविता बालकवींच्या कवितेहून प्रगल्भ आहे. सामाजिक

---

[१] अ.ना. देशपांडे , आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग १ व्हीनस , पुणे, प्र. आ. १९७४ पृ. ३३५

[२] डॉ. रा.शं. वाळिंबे, फुलराणी [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टलप्र. पुणे, प्र. आ. १९८६, प्रस्तावना.

वास्तवाची तिला जाण आहे. बालकवींची कविता प्रामुख्याने निसर्ग-सौंदर्यात हरपून गेलेली कविता आहे. तिच्यावर तत्त्वज्ञानाचे गडद रंग उमटू शकलेले नाहीत. बालकवींच्या बालसुलभवृत्तीचा हा परिणाम असावा. सुमित्रानंदन पंतांची कविता या दृष्टिने अधिक संपन्न आहे. त्यांच्या कविते‌वर तात्त्विकतेची छाप दिसते.

[४] बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघेही बहुश्रुत. दोघेही अनेक कवींच्या आणि साहित्यिकांच्या सहवासात आले. या सहवासातून दोघांनाही प्रेरणा , प्रोत्साहन लाभले, परंतु बालकवींच्या कवितेवर या अन्य साहित्यिकांचा किंवा कवींचा फारसा प्रभाव पडलेला नाही, पण सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत हा प्रभाव निश्चितपणे दिसून येतो.

सुमित्रानंदन पंतांची एकूण कविता बालकवींच्या कवितेहून अधिक रूपांनी व्यक्त झालेली आहे. सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत अधिक रूपे, अधिक विषय आणि अभिव्यक्तीचे अनेक प्रकार आढळतात. छायावादाच्या प्रभावाखाली त्यांनी जसे काव्यलेखन केले, तसेच " प्रगतिवादी " आणि " प्रयोगवादी " प्रभावाखालीही ब-याच कविता लिहिल्या. सामाजिकता, तात्त्विकता याबाबतीत त्यांची कविता प्रगल्भ अशी आहे. असा फरक पडण्याचे कारण म्हणजे सुमित्रानंदन पंतांना लाभलेले दीर्घ आयुष्य हे होय. बदलत्या काळाप्रमाणे त्यांची कविता बदलत राहिली, नव्या वाटा चोखाळत राहिली. अल्प आयुष्यामुळे बालकवींच्या कवितेला अशी उसंतच लाभली नाही.

=0=0=0=0=0=0=0=0=